# शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव
# ता. चाकूर जि. लातूर.

-----------------------------------------------------

## विषय:- समाजशास्त्र

वर्ग:- B A S Y सत्र- III

## पेपरचे नाव:- भारतीय समाज: संरचना आणि बदल - V

(Indian Society: Structure & Change- V)

---

## * शीर्षक:- ग्रामीण समुदायाची व्याख्या आणि वैशिष्ट्ये-

. रामराव धेनू चव्हाण
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
शिवजागृती वरिष्ठ प्रामहाविद्यालय, नळेगाव.

Edit with WPS Office

# A. ग्रामीण समुदायाची व्याख्या आणि वैशिष्ट्ये - (Definition and Characteristics of Rural Community)

प्रस्तावना ( INTRODUCTION) :- भारत हा खेड्यांचा देश आहे. कारण भारतातील बहुसंख्य लोक हे खेड्यांमध्ये वास्तव्य करतात. 2011 च्या जनगणने प्रमाणे भारताची लोकसंख्या 121,01,93,422 म्हणजे 1.21 अब्ज आहे. भारतीय समाजाची रचना तीन प्रादेशिक समुदायात करण्यात आलेली आहे. त्यात आदिवासी समाज ग्रामीण समाज व नागरी समाज यांचा समावेश होतो. त्यापैकी ग्रामीण समाज एक प्राचीन काळापासून प्रचलित आहे म्हणून समाजशास्त्रज्ञ क्रोपोहकिन असे म्हणतो की, "जगात असा कोणताही वंश नाही की ज्याची सुरुवात ग्रामीण समुदायाने झालेली नाही." खेड्यांच्या स्वतंत्र अंगभूत वैशिष्ट्यांमुळे भारतीय ग्रामीण समाज जीवनाला वेगळ्या प्रकारचे स्वरूप प्राप्त झाले आहे. प्राचीन ग्रामीण समाजाची (गावाची) कल्पना पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे. "तथा शूद्र जन प्राया सुखसमृद्ध कृषीवला. क्षेत्रोपभोग भुर्मध्ये वसती ग्राम सज्ञिता." याचा अर्थ असा की, तिच्या सभोवती वहितिला योग्य जमीन आहे आणि जिच्या मते समृद्ध शेतकरी व अनेक मजूर आहेत. अशा वस्तीला गाव असे म्हणतात." ग्रामीण समाजाचा अर्थ सुस्पष्ट होण्यासाठी काही विचारवंतांनी केलेल्या व्याख्यांचा परामर्श पुढील प्रमाणे घेण्यात आला आहे.

Edit with WPS Office

# B. ग्रामीण समुदायाची व्याख्या:-

## ( Definition of Rural Community )

०१) प्रा. त्री. ना. अत्रे गावगाडा या महत्वपूर्ण ग्रंथात खेड्याची व्याख्या करताना म्हणतात, "खेडणे म्हणजे जमीन कसणे, खेडूत म्हणजे जमीन कसणारा. तेव्हा खेडूतांची जी वस्ती ते खेडे होय. ज्यामध्ये प्रधान धंदा शेती व ज्यामध्ये कसणाऱ्याची वस्ती शेतकऱ्यांची असते त्या गावाला खेडे असे म्हणतात."

०२) एफ स्टुअर्ट चॅपिन:- "ग्रामीण लोकसंख्या व ग्रामीण सामाजिक संघटना व ग्रामीण समाजातील सामाजिक प्रक्रियेमुळे जो समाज प्रभावित होत असतो तो ग्रामीण समाज होय."

०३) ब्रुनर :- "एक ग्रामीण समुदाय व्यक्तींचा असा सामाजिक समूह आहे. जो निश्चित भौगोलिक क्षेत्रामध्ये निवास करतो आणि जीवनाच्या सामान्य मार्गाचा अवलंब करतात."

०४) ई. एस. बोगार्डस:- "ग्रामीण समुदाय हा प्राथमिक समूहाचेच विस्तृत स्वरूप आहे."

०५). सिम्स :- "शेतकऱ्यांचे वस्तीस्थान म्हणजे ग्रामीण समुदाय होय."

थोडक्यात असे म्हणता येते की ग्रामीण समुदाय हा व्यक्तीचा असा गट आहे की एका विशिष्ट क्षेत्रांमध्ये आपल्या अनेक उद्देशाच्या पूर्तीकरिता संस्कृतिक, सामाजिक ,आर्थिक या प्रकारचा संबंध ठेवतो की, ज्यामुळे ते दुसऱ्या समुदायापेक्षा भिन्न स्वरूपाचा असल्याचे लक्षात येते. विशेषतः म्हणजे या समुदायातील बहुतांशी लोक शेती व्यवसाय करतात.

Edit with WPS Office

# C. ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये:-
## ( Characteristics of Rural Community )

०१) शेती हा प्रमुखव्यवसाय
०२) संयुक्त कुटुंबाची पद्धत
०३) लहान आकारमान
०४) कमी लोकसंख्या असते
०५) सामाजिक स्तरीकरण
०६) सामाजिक गतिशीलतेचा अभाव
०७) लोकमताचा प्रभाव
०८) विशेषीकरणचा आभाव
०९) साधे व प्रामाणिक जीवन
१०) स्त्रियांचा दुय्यम दर्जा
११) अनौपचारिक स्वरूपाची संबंध
१२) सजातीय लोकसंख्या
१३) जननिंदेची भीती
१४) धर्म, रूढी व परंपराचा प्रभाव
१५) अंधश्रद्धा
१६) बलुता पध्दती

Edit with WPS Office